# प्रेसनोट दि. ०६/०८/२०१८

## लॉजवर छापा कारवाईद्वारे २ सिक्कीम व १ दिल्ली अशा एकुण ३ महिलांची हायप्रोफाईल वेश्याव्यवसायातुन सुटका

दि.०४/०८/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, यांना पोलीस नाईक सचिन कदम यांचेकडुन माहीती मिळाली की, इसम नामे योगी ऊर्फ मॉन्टी पटेल हा त्याचा साथीदार करण शर्मा तसेच दिनेश या एजंटसच्या मदतीने राज्यातील मुली वेश्याव्यवसायासाठी मिळवुन वेगवेगळ्या लॉजेस मध्ये त्यांचे नावे रुम बुक करुन तेथे ठेवुन, वेश्यागमनासाठीच्या ग्राहकांबरोबर मोबाईल फोनच्या माध्यमातुन संपर्क साधुन, वेश्यागमनासाठीची रक्कम ठरवुन ग्राहकांना नमुद लॉजेस मध्ये पाठवुन मुलींकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत असले बाबत अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी व विमानतळ पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक श्री. रमेश साठे व कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई करुन लॉज श्रीकृष्णा इन, ८१, लेन नं. ३, स नं २३७, मेटे नगर, संजय पार्क, विमाननगर पुणे या लॉजमध्ये वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला.

छाप्या दरम्यान २ सिक्कीम व १ दिल्ली राज्यातील अशा एकुण तीन सज्ञान पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन आरोपी इसमनामे १) करण शर्मा, २) योगी ऊर्फ मॉन्टी पटेल ३) दिनेश ४) प्रशांत मच्छिंद्र पाटील वय ४२ वर्षे रा. सदर मुळगांव मु. पो. शहापुर ता. अमळनेर जिल्हा जळगांव. यांचे विरुध्द विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर गुरनं. २३४/२०१८ पिटा ॲक्ट १९५६ चे क. ३,४,५ सह भादवि कलम ३७०,३७०(अ),३४. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाईचे वेळी आरोपी प्रशांत मच्छिंद्र पाटील यास ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ५०००/- व ३ मोबाईल फोन किमंत ७०००/- रुपये, इतर कागदपत्रे असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु फाऊन्डेशन, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. शिरिष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, पोउनि अनंत व्यवहारे, नामदेव शेलार, राजाराम घोगरे, सचिन कदम, तुषार आल्हाट, सुनिल नाईक, राजेद्र ननावरे, अनुराधा धुमाळ, कविता नलावडे, राजेद्र कचरे, सचिन शिंदे यांनी व विमानतळ पोलीस स्टेशनचे वपोनि श्री. दिलीप शिंदे, पो.नि.(गुन्हे) श्री. रमेश साठे व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.